# " खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती "

## वारंवार विचारले जाणारे प्रश्न

| | | |
|---|---|---|
| १ | प्रश्न | गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती ही योजना कोणत्या विभागामार्फत राबविली जाते? |
| | उत्तर | ही योजना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत राबविली जाते. |
| २ | प्रश्न | गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती ही योजने करिता अर्ज कसा व कोठे करावा ? |
| | उत्तर | संचालक, उच्च शिक्षण, पुणे व संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांच्या अधिपत्याखाली जे अभ्यासक्रम राबविले जातात अशा अभ्यासक्रमाशी संबंधित सदर शिष्यवृत्तीसाठी जाहीर करण्यांत आलेल्या वेळापत्रकानुसार **https://foreignscholarship2022.dte.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर online पद्धतीने अर्ज करावा . |
| ३ | प्रश्न | या योजने अंतर्गत कोणत्या अभ्यासक्रमास शिष्यवृत्ती देण्यात येते ? |
| | उत्तर | पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते |
| ४ | प्रश्न | पदवी अभ्यासक्रमास शिष्यवृत्ती देण्यात येते काय ? |
| | उत्तर | नाही |
| ५ | प्रश्न | किती विध्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते ? |
| | उत्तर | शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे शाखा निहाय मर्यादा प्रत्येक वर्षासाठी निश्चित करण्यात आली आहे. |

| अ. क्र. | शाखा / अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | कला | ०१ | ०१ | ०२ |
| २. | वाणिज्य | ०१ | ०१ | ०२ |
| ३. | विज्ञान | ०१ | ०१ | ०२ |
| ४. | व्यवस्थापन | ०१ | ०१ | ०२ |
| ५. | विधी अभ्यासक्रम | ०१ | ०१ | ०२ |
| ६. | अभियांत्रिकी/ वास्तुकला शास्त्र | ०४ | ०४ | ०८ |
| ७. | औषधनिर्माणशास्त्र | ०१ | ०१ | ०२ |
| | **एकूण** | **१०** | **१०** | **२०** |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रश्न | शिष्यवृत्ती करिता मुलींसाठी निवड करण्यात येणार काय ? |
| | उत्तर | होय, शिष्यवृत्ती द्यावयाच्या एकूण जागेपैकी ३०% जागांवर मुलींची निवड करण्यात येईल. |
| ७ | प्रश्न | शिष्यवृत्ती करिता परदेशातील  कोणत्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणे आवश्यक आहे? |
| | उत्तर | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये  प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे, अद्ययावत (सन २०२२ मधील) THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आंत असणे बंधनकारक आहे. |
| ८ | प्रश्न | परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी  शिष्यवृत्ती करिता अर्ज करण्यासाठी शैक्षणिक अर्हता काय आहे ? |
| | उत्तर | परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी  प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किंमान ६०% गुणांसहित पदवी परीक्षा अर्जाच्या दिनांकाला उत्तीर्ण केलेली असावी. |
| ९ | प्रश्न | परदेशातील पीएचडी अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती करिता अर्ज करण्यासाठी शैक्षणिक अर्हता काय आहे ? |
| | उत्तर | पीएचडी अभ्यासक्रमासाठी  प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किंमान ६०% गुणांसहित पदव्युत्तर पदवी परीक्षा अर्जाच्या दिनांकाला उत्तीर्ण केलेली असावी. |
| १० | प्रश्न | नोकरीमध्ये असलेल्या उमेदवारांनी तो जेथे नोकरी करतो त्या यंत्रणेचे (organization Employer) ना-हरकत प्रमाणपत्र देणे अनिवार्य आहे काय? |
| | उत्तर | होय |
| ११ | प्रश्न | विद्यार्थ्यास  जामीनदार देणे बंधनकारक आहे काय? |
| | उत्तर | होय,  शिष्यवृत्तीसाठी निवड झाल्यानंतर विद्यार्थ्याने दोन जामीनदार देणे बंधनकारक आहे. |
| १२ | प्रश्न | परदेशी शैक्षणिक संस्थेकडून Conditional Offer Letter मिळालेले आहे. ग्राह्य धरण्यात येईल काय? |
| | उत्तर | ज्या विद्यार्थ्यांना परदेशी शैक्षणिक संस्थांकडून Unconditional Offer Letter मिळालेले असेल, त्यांनाच ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहील, यासाठी Conditional Offer Letter गृहीत धरले जाणार नाही. तथापि प्रवेश मिळण्यासाठी अनिवार्य असलेल्या शैक्षणिक पात्रतेच्या अटीच्या अधीन Offer Letter असल्यास ग्राह्य धरण्यात येणार नाही. |
| १३ | प्रश्न | पासपोर्ट व व्हिसा मिळविण्यासाठी शासन कोणती मदत करेल? |
| | उत्तर | पासपोर्ट व व्हिसा मिळविण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची असेल. |

| | | |
|---|---|---|
| १४ | प्रश्न | शिष्यवृत्ती करिता अर्ज करण्यासाठी उत्पन्नाची अट आहे काय? |
| | उत्तर | विद्यार्थ्यांच्या पालकांचे (आई आणि वडील) /कुटुबांचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२१-२२ मधील) वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा जास्त नसावे. |
| १५ | प्रश्न | विद्यार्थी किंवा पालक किंवा दोन्ही नोकरीत असतील तर शिष्यवृत्ती करिता अर्ज करण्यासाठी उत्पन्नाशी संबंधित कोणती कागदपत्र सदर करावी लागतील? |
| | उत्तर | विद्यार्थी किंवा पालक किंवा दोन्ही नोकरीत असतील तर त्यांचे आयकर विवरणपत्र, फॉर्म न. १६ व सक्षम प्राधिकारी (तहसिलदार किंवा नायब तहसिलदार पेक्षा कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागील आर्थिक वर्षाचे (२०२१-२२ मधील) कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र. |
| १६ | प्रश्न | विद्यार्थी नोकरी करीत नसल्यास उत्पन्नाशी संबंधित कोणती कागदपत्र सादर करावी लागतील? |
| | उत्तर | सक्षम प्राधिकारी (तहसिलदार किंवा नायब तहसिलदारपेक्षा कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागील आर्थिक वर्षाचे (२०२१-२२ मधील) कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र. |
| १७ | प्रश्न | चालू शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेला विद्यार्थी शिष्यवृत्तीचा अर्ज कसा करु शकतो ? |
| | उत्तर | यासाठी विद्यार्थ्याने ऑन-लाईन अर्ज भरुन त्याची प्रिंट काढून प्राधिकृत व्यक्तीकडे पाठवावी. प्राधिकृत व्यक्तीमार्फत त्यास अर्ज व कागदपत्रे विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण यांचेकडे जमा करता येतील. |
| १८ | प्रश्न | मागास प्रवर्गातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करु शकतात काय ? |
| | उत्तर | होय, मात्र ज्या मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना अशा स्वरूपाची परदेशी शिष्यवृत्ती लागू केली आहे अशा मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी त्या-त्या प्रशासनिक विभागाच्या योजनेमध्ये अर्ज करणे अपेक्षित आहे. त्यामुळे अन्य प्रशासनिक विभागाच्या परदेशी शिष्यवृत्तीच्या योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र असलेले विविध मागास प्रवर्गातील विद्यार्थी वगळून इतर सर्व विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करु शकतात. |
| १९ | प्रश्न | राज्याचा अधिवास विद्यार्थी अथवा त्याचे आई-वडिल यांचेकडे नाही असे विद्यार्थी या योजनेसाठी पात्र आहेत काय? |
| | उत्तर | नाही. |
| २० | प्रश्न | कुटुंबाची उत्पन्न मर्यादा रुपये ८.०० लाख पेक्षा जास्त असलेले विद्यार्थी या योजनेसाठी पात्र आहेत काय? |
| | उत्तर | नाही. |
| २१ | प्रश्न | निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती कशी दिली जाणार आहे ? |
| | उत्तर | पात्र विद्यार्थ्यांने चालू वर्षात केलेला मान्य खर्च विचारात घेऊन शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा केली जाणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप संस्थेकडे शिक्षण शुल्काची रक्कम जमा केलेली नाही अशा विद्यार्थ्यांची ही रक्कम थेट संस्थेच्या खात्यात जमा केली जाणार आहे. |

| | | |
|---|---|---|
| २२ | प्रश्न | काही अपरिहार्य कारणावरुन विद्यार्थ्यास मुदतीत अर्ज करता आला नाही तर विहित मुदतीनंतर चालू वर्षाकरीता अथवा पुढील वर्षाकरीता अर्ज करता येईल काय ? |
| | उत्तर | नाही. |
| २३ | प्रश्न | विद्यार्थ्याची निवड कशी करता येणार आहे ? |
| | उत्तर | विद्यार्थ्याची निवड त्याने इयत्ता १० वी, १२ वी / पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी मध्ये प्राप्त केलेले गुण, त्याने प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाचे QS / किंवा THE Ranking इत्यादीच्या आधारे प्राप्त होणाऱ्या गुणांच्या आधारे करण्यात येणार आहे. |
| २४ | प्रश्न | विद्यार्थ्याकडे त्याने प्राप्त केलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या प्रमाणपत्रामध्ये गुणांची टक्केवारी उपलब्ध नसल्यास अथवा त्याबाबतचा कोणताही Formula संबंधित बोर्डाने / विद्यापीठाने दिला नसल्यास अशा विद्यार्थ्यांचे गुण कसे विचारात घेण्यात येणार आहेत ? |
| | उत्तर | गुणांच्या टक्केवारीसाठी अधिकृत Conversion formula उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी विद्यार्थ्यावर आहे. अन्यथा छाननी समिती / निवड समिती विद्यार्थ्याला मिळालेल्या ग्रेडच्या आधारे, त्या ग्रेड मधील किमान गुण दर्शवेल, जे विद्यार्थ्यावर बंधनकारक राहील. |
| २५ | प्रश्न | शिष्यवृत्तीची निवड करण्यासाठी कोणते Ranking विचारात घेतले जाणार आहेत ? |
| | उत्तर | विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड करताना अद्ययावत उपलब्ध असलेले QS / व THE Ranking average विचारात घेतले जाणार आहेत. |
| २६ | प्रश्न | सद्यस्थितीत विद्यार्थी परदेशी विद्यापीठात शिक्षण घेत असल्यास, विद्यार्थ्याने कागदपत्रांची पडताळणी कशी करावी ? |
| | उत्तर | विद्यार्थी परदेशी विद्यापीठात शिक्षण घेत असल्यास, तो, त्याचे पालक अथवा कोणत्याही सज्ञान व्यक्तीस कागदपत्रांच्या पडताळणीसाठी प्राधिकृत करु शकतो. प्राधिकृत व्यक्तीमार्फत त्यास अर्ज व कागदपत्रे विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण यांचेकडे पडताळणी करुन जमा करता येतील. |
| २७ | प्रश्न | उमेदवार त्याची मूळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे परदेशात प्रवेश घेण्यासाठी घेऊन गेला असेल तर कागदपत्रांची पडताळणी कशी करावी ? |
| | उत्तर | अशा प्रकरणी उमेदवाराने त्याच्या कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती (सही शिक्क्यासह) तो शिकत असलेल्या विद्यापीठातील संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रमाणित करुन घेऊन अथवा परदेशातील भारतीय दूतावासातून प्रमाणित करुन घ्याव्यात व त्या Scan करुन E-mail व्दारे तात्काळ पाठवाव्यात, आणि मूळ प्रमाणित साक्षांकित प्रती कुरीयर ने संचालनालयास पाठवाव्यात. |